# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## ( कुलसचिव कार्यालय )

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

फोन/फॅक्स नं. ०७१३२-२२३१०४ email:-registrar.gondwanauniversity@gmail.com

जा.क्र. /गो.वि.ग/कुसका/६२४९८/२०१७ दि. १५/०७/२०१७

## अधिसुचना

**विषय :- विद्यापरिषद निवडणूका(मतदान केंद्रावरील)**

महाराष्ट्र शासनाने दिनांक ०१ मार्च, २०१७ पासुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ लागु केला आहे. त्यातील **कलम ३२(३) नुसार विद्या परिषदेचे** गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम ३२ (३)(g) नुसार अध्यापक गटाने त्यांच्यामधून १५ वर्षापेक्षा कमी नसेल इतका अध्यापनाचा अनुभव असलेले प्रत्येक विद्याशाखेचे दोन अध्यापक निवडून द्यावयाचे आहेत. यादृष्टीने सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अध्यापक यांच्या मतदार यादया तयार करावयाच्या आहेत.

तरी सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना या अधिसूचनेद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात/परिसंस्थेमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या www.unigug.org या संकेतस्थळावर Election portal अंतर्गत Collegiums link मध्ये विहीत केलेल्या नमुना प्रपत्रामध्ये आवश्यक असलेली सर्व माहितीची नोंद केल्यावर त्या प्रपत्राची प्रिंट काढून आवश्यक ते दस्तऐवज प्रपत्रासोबत जोडून एकत्रितरित्या विद्यापीठास शनिवार दिनांक ०५/०८/२०१७ रोजी किंवा त्यापुर्वी पोहचेल अशा बेताने सादर करावी.

प्रत्येक अध्यापकांच्या माहितीसोबत खालील दस्तऐवज सांक्षाकीत करून जोडणे आवश्यक आहे.

१) व्याख्याता/सहायक प्राध्यापक/प्रपाठक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक म्हणुन विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.

२) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणुन विद्यापीठाच्या मान्यता पत्राची प्रत.

३) अध्यापक मागास प्रवर्गातील असल्यास त्यांच्या जातीचा दाखला व जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत.

प्राधिकरणावर निवडुन द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात महराष्ट्र सर्वाजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या आहेत. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेच्या, अध्यापकांची माहिती विहीत मुदतीत प्राप्त होणार नाही त्या अध्यापकांच्या नावाचा समावेश संबधीत गटाच्या मतदार यादीमध्ये करण्यात येणार नाही आणि यासाठी महाविद्यालयांचे प्राचार्य / अध्यापक जबाबदार राहील, यांची नोंद घ्यावी.

विधी आणि विधानामधील कोणत्याही तरतुदीचा अर्थ काढण्यासंबंधात अडचण येत असल्यास विधी विधानाचे इंग्रजी प्रतीमधील तरतुद प्रमाण मानण्यात येईल.

(दिपक एस. जुनघरे)
कुलसचिव(का.) आणि
निवडणूक निर्णय अधिकारी

प्रति,

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे
मा. प्राचार्य, व मान्यताप्राप्त परिसंस्थाचे मा. संचालक